## चार ब्रास वाळूसह हायवा जप्त; गुन्हा नोंद

**नांदेड :** भोकर येथील उमरी चौक परिसरात रविवारी (ता. २१) रात्री नऊच्या सुमारास बाबूखान हुसेनखान पठाण (वय ४८, रा. प्रफुल्लनगर, भोकर) व बालाजी उमाजी राचेवाड (वय ४०, रा. सायाळ, ता. भोकर) हे हायवामधून (एमएच-२६, सीएच-४४२४) चार ब्रास वाळूची बेकायदेशीर वाहतूक करीत होते. पोलिसांनी ३० लाख रुपये किमतीचा हायवा व २० हजार रुपये किमतीची वाळू असा मुद्देमाल जप्त केला. भोकर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद केल.

## निधन

### रामराव आसोले



**बरडशेवाळा** : कवाना (ता. हदगाव) येथील रामराव आसोले (ता.७५) यांचे सोमवारी (ता.२२) सायंकाळी सहाच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी (ता.२३) सकाळी वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. संतोष व माजी सरपंच नंदकुमार आसोले यांचे ते वडील होत.

### बबनराव सोमासे



**फुलवळ** : बबनराव चंदर सोमासे (वय ८०, रा. फुलवळ, ता. कंधार) यांचे सोमवारी (ता.२२) निधन झाले. त्यांच्यावर मंगळवारी (ता.२३) सकाळी १० वाजता सोमासवाडी (ता. कंधार) येथे शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### श्यामसुंदर केंद्रे



**किनवट** : राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस तथा पार्डी येथील श्यामसुंदर केंद्रे यांचे सोमवारी (ता. २२) दुपारी एकच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी (ता.२३) सकाळी पार्डी (खुर्द) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### अरुण भंडारे



**किनवट** : ज्येष्ठ पत्रकार तथा मुद्रांक विक्रेते अरुण उर्फ बाळू पारप्पा भंडारे (वय ६५) यांचे दीर्घ आजाराने सोमवारी (ता.२२) सकाळी दहाच्या सुमारास निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा मंगळवारी (ता. २३) सकाळी ९ वाजता शिवाजी चौक येथील निवासस्थानापासून निघणार असून, घोटी रस्त्यावरील त्यांच्या शेतात त्यांच्या अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

### अंकुश वाठोरे



**हदगाव** : तालुक्यातील हरडफ येथील अंकुश सदाशिव वाठोरे (वय २७) यांचे शनिवारी (ता.२०) सकाळी साडेनऊच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर हरडफ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. परसराम वाठोरे यांचे ते भाऊ, तर पत्रकार गौतम वाठोरे यांचे ते चुलत भाऊ होते.

# ‘डमी’च्या हाती कारभार सोपवून तलाठी बिनघोर

## उमरी येथील तलाठी सजा कार्यालयातील पाहणीत आले समोर

**कुठेय तलाठी?**

ग्राउंड रिपोर्ट

उमरी, ता. २२ (बातमीदार) : शहरातील व्यंकटेशनगरात भाड्याने घेतलेल्या चार सजा कार्यालयांपैकी एकाच सजा कार्यालयात तलाठी हजर होते, तर दोन कार्यालयांत तलाठ्याचे ‘डमी’ आणि त्याच्याभोवती तलाठ्याच्या प्रतीक्षेत विविध गावांवरून आलेले शेतकरी आणि नागरिकांचा गराडा, तर एका सजा कार्यालयाचा दरवाजा केवळ सताड उघडा होता, तिथे ना तलाठी होते ना कुणी हे ‘सकाळ’च्या टीमने मंगळवारी (ता.२२) दुपारी बाराच्या सुमारास केलेल्या पाहणीत उघड झाले.

उमरी शहरातील व्यंकटेशनगरात तालुक्यातील सर्वच सजांची कार्यालये तलाठ्यांनी भाड्याच्या खोलीत थाटलेली आहेत. येथे आलेल्या शेतकऱ्यांना आपण कोणत्या कामासाठी आलात? आपले काम झाले का? असे विचारले असता शेतकऱ्यांऐवजी उपस्थित डमीनेच ‘तलाठी साहेब पंचनामा करण्यासाठी गेले आहेत, तहसील कार्यालयात गेले आहेत, अशी माहिती देण्यात आली. परंतु, याची खात्री करण्यासाठी तहसील कार्यालयात चौकशी केली असता संबंधित तलाठी तेथेही उपस्थित नसल्याचे समोर आले. त्यामुळे तलाठी नेमके गेले कुठे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. महसूल विभागातील दाखले, फेरफार, पीकपाणी, वारस नोंदी, उत्पन्न प्रमाणपत्रे आदी कामांसाठी नागरिकांना तलाठी कार्यालयांवर अवलंबून राहावे लागते. मात्र, अधिकारी वेळेवर उपस्थित नसल्याने सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



**उमरी** : व्यंकटेशनगरातील एका सजा कार्यालयात तलाठ्याच्या प्रतीक्षेतील शेतकरी.

### किती ही दहशत?

**■ येथे आलेल्या शेतकऱ्यांना आपण कोणत्या कामासाठी आलात? आपले काम झाले का? असे विचारले असता अनेक शेतकऱ्यांनी ‘आज बोललो, तर उद्या काम अडेल’ असे सांगत नाव न छापण्याच्या अटीवर तलाठ्यांकडून होणाऱ्या अडवणुकीचा पाढा वाचला. यावरून शेतकरीदेखील आपले काम होणार नाही म्हणून आवाज उठवित नसल्याचे संबंधित उपाशीपोटी ताटकळत असलेल्या शेतकऱ्याने सांगितले.**

## सकाळ भूमिका

### तलाठ्यांनो, सामान्यांचे तळतळाट पचवणार कसे?

गावगाडा हाकणाऱ्या कारभाऱ्यांमधील तलाठी हा एक महत्त्वाचा घटक. सातबारा काढण्यापासून ते सातबाऱ्यावर मालकी हक्क चढविण्यापर्यंत प्रत्येक व्यवहारात तो गरजेचाच. कधीकाळी लोकसेवेसाठी तत्पर असलेला हाच तलाठी आता मात्र अनिर्बंध स्वातंत्र्य भोगतो आहे. सर्वसामान्यांची अडवणूक करून वारेमाप वसुली करण्यात त्याला धन्यता वाटते आहे. त्याला ना जिल्हाधिकाऱ्यांची भीती, ना मंत्र्यांची. असं का होत आहे, याचा विचार राज्य सरकार का करीत नाही? तलाठ्यांच्या वसुलीचे ‘रेटकार्ड’ अख्ख्या तालुक्याला माहिती असते. परंतु, ते जिल्हाधिकारी आणि महसूलमंत्र्यांना माहीत नसते, यावर कुणाचा विश्वास बसेल का? म्हणूनच सरकारने या लुटीला अधिकृत म्हणून मान्यता द्यावी. तसेच तलाठ्यांचे लुटीचे रेटकार्डही कार्यालयात लावण्याची मुभा द्यावी. म्हणजे सामान्य माणसाला हा व्यवहार सवयीचा होऊन जाईल. तलाठ्यांनी स्वतःच्या मदतीसाठी नेमलेल्या बेकायदा डमी तलाठ्यांच्या तऱ्हा तर आणखी वेगळ्या. असा हा बेबंद कारभार सुरू असतो. तरीही त्यांच्यावर कारवाईसाठी कुणीही धजावत नाही. सर्वसामान्यांची लूट करण्यासाठीच हे पद निर्माण केले की काय, असं वाटावं इतपत या लोकांमधला निलाजरेपणा सोकावला आहे. शंभर रुपयांत होणारे महसूलमधील काम जेव्हा लाखांवर जाते, तेव्हा सामान्य माणूस या लुटारूंना तळातळाटाशिवाय दुसरं काहीच देत नाही. नंतर या तळातळाटाला कोणता रंग चढतो आणि तो कुठे वाहतो, हे तलाठ्यांना चांगलेच ठाऊक आहे. जर सरकारला यांची थेरं बंद करता येत नसतील, तर ही लूट ‘सकाळ’च्या माध्यमातून आम्ही चव्हाट्यावर आणणार आहोत.

■ संपादक

### नागरिकांना आवाहन

सर्वसामान्यांना होत असलेल्या त्रासाला ‘सकाळ’ने वाचा फोडली असून कुठेय तलाठी? ही रोखठोक वृत्तमालिका सुरू केली आहे. आता नागरिकांनीही पुढे येण्याची गरज आहे. तलाठी, त्याने वसुलीसाठी ठेवलेल्या डमीकडून आलेला कटू अनुभव, एखादा प्रसंग, झालेला त्रास, रेंगाळलेले काम याविषयी सविस्तर लिहून ‘सकाळ’कडे पाठवा. याला आम्ही ठळक प्रसिद्धी देऊ.

**। रामेश्वर काकडे ९८९०८०८९२५ । मारुती खंदारे ९८५०९९३८९१ । दीपक रत्नपारखे ९८२३५६५८२० । गौरव वाळिंबे ९१७२००७३००**

# तहसील कार्यालयाला घेराव घालून निदर्शने

## निराधारांचे अनुदान रखडले, शिवसेना आक्रमक

**देगलूर, ता. २२ (बातमीदार) :** तालुक्यातील श्रावण बाळ, संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी वृद्धापकाळ व अपंग योजनांतील लाभार्थींचे अनुदान तीन महिन्यांपासून रखडल्याने गरीब, वृद्ध, निराधार व अपंग नागरिकांवर उपासमारीची वेळ आली आहे. शासनाचे पोर्टल बंद असल्यामुळे अनुदानाचे वितरण थांबले असून, या निषेधार्थ शिवसेनेच्या (यूबीटी) वतीने सोमवारी (ता. २२) देगलूर तहसील कार्यालयावर घेराव घालून तीव्र निदर्शने करण्यात आली.

तालुक्यात श्रावण बाळ योजनेचे ६,७८६, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजनेचे ४,६४४ आणि संजय गांधी निराधार योजनेचे ४,८०८ असे एकूण १६ हजार २३८ लाभार्थी आहेत. या सर्वांचे तीन महिन्यांचे अनुदान रखडल्याने अनेक गरजू कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटली आहे. अनेक लाभार्थींचा उदरनिर्वाह याच शासकीय मदतीवर अवलंबून असल्याने शासनाने तातडीने अनुदान वितरित करावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. यावेळी नायब तहसीलदार गणेश रायेवार यांना घेराव घालून जाब विचारण्यात आला व तातडीने शासनाकडे पाठपुरावा करून रखडलेले अनुदान लाभार्थींच्या खात्यात जमा करण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, पांडुरंग पाटील थडके यांच्यासह शेकडो वृद्ध, निराधार, अपंग व महिला-पुरुष मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

यावेळी अनुदान तातडीने खात्यात जमा न झाल्यास काही दिवसांत तहसील कार्यालयाला कुलूप ठोकून बेमुदत धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.


**SBI स्टेट बँक ऑफ इंडिया** — एसबीआय होम लोन सेंटर, नांदेड — **ताबा सूचना**

फोन नं. : 02462-285561, फॅक्स : 02462-287740 | ईमेल आयडी : sbi.61077@sbi.co.in | ब्रँच कोड : 61077

सदर मालमत्ता सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकस्ट्रक्शन ऑफ फानान्शियल ॲसेटस ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 कायदयाचे कलम 13 (12) नियम 3 अन्वये भारतीय स्टेट बँक, यांनी **सांकेतिक ताब्यात** घेतला आहे. तरी कर्जदार, जामीनदार व तमाम जनतेस कळविण्यात येते आहे की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही, कोणाशीही, कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा / हस्तांतरणाचा करार करु नये. या उपर कोणीही तसा व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर ठरवून भारतीय स्टेट बँक, यांचेवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने दखल घ्यावी.

कर्जदारांनी लक्ष दयावे की सेक्शन 13 च्या सब-सेक्शन (8) च्या प्रावधानानुसार मालमत्ता परत सोडविण्याकरीता उपलब्ध वेळेमध्ये आमंत्रित केले आहे.

| कर्जदार नाव व पत्ता | मालमत्तेचे विवरण | मागणी नोटीसीची तारीख व रक्कम | ताबा घेतल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| **कर्जदार- श्री. विलास कोंडजी काकडे** | **मालमत्ता मालकी हक्क - श्री. विलास कांडजी काकडे,** रो-हाऊस नं.15, साई ज्योती रेसिडेन्सी, रामा सिटी मागे, पदमावती नगर, मौजे वाडी (बु.) ता.जि. नांदेड- 431 605. **चतुःर्सिमा - पुर्व** - गणेश पावडे यांची शेतीची जमीन, **पश्चिम** - 20 फुट रुंद अंतर्गत रस्ता, **उत्तर** - रो-हाऊस नं. 16, **दक्षिण** - रो-हाऊस नं. 14 | दि. 27/03/2026 रु. **25,23,336/-** **व्याज आणि खर्च** दि. 27/03/2026 **पासून** | 16.06.2026 |
| **कर्जदार- श्री. बिरेनदर सिंह नारायण सिंह बेदी आणि श्री. गुरुचरण सिंह नारायणसिंह बेदी** | **मालमत्ता मालकी हक्क - श्री. बिरेनदर सिंह, नारायणसिंह बेदी आणि गुरुचरण नारायणसिंह बेदी,** सिटीएस नं.2227, घर नं. 3/3/452, गुरुव्दारा गट नं. 03, नांदेड. **चतुःर्सिमा - पुर्व** - पटनुरकर यांचे घर , **पश्चिम** - रस्ता, **उत्तर** - गादीवाले यांचे घर, **दक्षिण** - गिरनीवाले यांचे घर | दि. 07/01/2024 रु. **8,49,549/-** **व्याज आणि खर्च** दि. 07/01/2024 **पासून** | 17.06.2026 |

दिनांक - 23.06.2026
ठिकाण - नांदेड

स्वैर भाषांतर : तफावत आढळल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य.

स्वाक्षरीत/- अधिकृत अधिकारी एसबीआय होम लोन सेंटर, नांदेड


# मावेजा देण्यासाठी ‘तारीख पे तारीख’

## सुधा प्रकल्प मावेजा प्रश्नावर शेतकऱ्यांचे जलसमाधी आंदोलन

**भोकर, ता. २२ (बातमीदार) :** येथील सुधा प्रकल्पाची उंची वाढवण्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांची अतिरिक्त जमीन भूसंपादित करण्यात आली आहे. मात्र, मावेजा देण्यासाठी संबंधित विभागाकडून सातत्याने ‘तारीख पे तारीख’ अशी भूमिका घेतली जात असल्याचा आरोप करत संतप्त शेतकऱ्यांनी सोमवारी (ता. २२) सुधा प्रकल्पात जलसमाधी आंदोलन सुरू केले.

तालुक्यातील एकमेव सुधा प्रकल्प हा परिसरातील शेतकऱ्यांसाठी संजीवनी ठरला आहे. प्रकल्पाची १.१० मीटर उंची वाढवण्यासाठी सहा गावांतील ३७.०७ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. मात्र, त्या जमिनीचा मावेजा देण्यासाठी शासनाकडून चालढकल केली जात असल्याचे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यापूर्वी तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले होते. त्यावेळी विष्णुपुरी प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता सी.आर. बनसोडे यांनी १० जून २०२६ पर्यंत मावेजा देण्यात येईल, असे आश्वासन दिल्याने उपोषण मागे घेण्यात आले होते. मात्र, आश्वासनाची पूर्तता न झाल्याने शेतकऱ्यांनी ७० टक्के मावेजा तातडीने देण्यात यावा, रस्ता व पुलांचे बांधकाम करण्यात यावे, या मागण्यांसाठी जलसमाधी आंदोलन सुरू केले. या आंदोलनात उत्तम बाभळे, अब्दुल रहिम करीम कुरेशी, तानाजी शिवेवार, शेख नईमोद्दिन हमीद मियाँ, प्रशांत शिवेवार, दत्ता कदम, बालाजी वनलवाड, माधव देवकर, संजय मुरगुलवाड, शंकर नवटक्के, सूर्यकांत वनलाड, गजानन नाईकवाड, शिवाजी चिलेवाड, शिवाजी हुबेवाड, बालाजी अटकलवाड आदी शेतकरी सहभागी झाले आहेत.

> प्रकल्पामुळे सिंचनाची सोय झाली असली तरी संपादित जमिनीचा मावेजा मिळण्यात दिरंगाई होत आहे. तातडीने न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल.
> **-उत्तम बाभळे,** शेतकरी

> दुसऱ्या टप्प्यातील कामाचा मावेजा देताना अधिकारी टाळाटाळ करत आहेत. आमच्यावर अन्याय होत आहे.
> **-शेख नईमोद्दिन हमीद मियाँ**

## राहेगावातील दोन भावांवर चोरीचा गुन्हा नोंद

**नांदेड :** राहेगाव येथील एका घरातील एक लाख ८० हजारांच्या दोन सोन्याच्या अंगठ्या चोरल्याप्रकरणी दोन भावांविरुद्ध गुन्हा नोंद केला. ही घटना सोमवारी (ता. १५) घडली. अंताजी चंपाती इंगळे (वय ३०, रा. राहेगाव) यांच्या अंगठ्या चोरीला गेल्या. याप्रकरणी साईनाथ मोतीराम भोंग (वय ३०) व आदिनाथ मोतीराम भोंग (वय २५, दोघे रा. राहेगाव) यांच्यावर नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा नोंदविला.


**बँक ऑफ इंडिया** — नातं बँकींग पलिकडचं...

**वसुली विभाग – सोलापूर आंचलिक कार्यालय**
सह्याद्री शॉपिंग सेंटर, जुना एम्प्लॉयमेंट चौक,
सोलापूर –४१३००१. फोन : ०२१७२–२३१९४७६
इमेल : Solapur.ARD@bankofindia.bank.in

**रुल ८(६) आर/डब्ल्यु ९ (१)**
**स्थावर मालमत्तेचा विक्री सुचना**

**ई लिलाव द्वारे स्थावर मिळकतींची विक्री नोटीस : सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरीटी इन्टरेस्ट ॲक्ट २००२, सिक्युरीटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल २००२ मधील तरतुद कलम 8(6) R/W 9(1)**

**ई लिलाव दिनांक व वेळ : दि.९ जुलै २०२६ स.११ ते सायं.५ पर्यंत (भारतीय प्रमाण वेळेनुसार)**

तमाम नागरिकांना, विशेषत: कर्जदार व जामीनदार यांना सुचना देण्यात येते कि कर्जदार/जामीनदार यांच्याकडुन येणे रक्कम बाकी पोटी बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी यांनी नमुद स्थावर मालमत्तेचा ताबा घेतला असुन सदर मालमत्तांचा ई–लिलाव द्वारे ''जेथे आहे तेथे, जसे आहे तसे, जेवढे आहे तेवढे '' या तत्वावर दि. ९ जलै २०२६ रोजी विक्रीस काढली आहे ज्याचा तपशील खालील प्रमाणे आहे

| अ. क्र. | प्रकार | जागेचे तपशिल | शाखा कर्जदाराचे/जामीनदाराचे नाव | मालमत्तेचे सविस्तर वर्णन | राखीव किंमत रु./ अनामत बयाणा रक्कम | एकुण येणे बाकी + व्याज + इतर खर्च | प्रोपर्टी इनस्पेकशन तारीख/वेळ प्राधिकृत अधिकारी नांव व मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | फ्लॅट (प्रात्यक्षिक ताबा) | मु.पो. वाडी बु, ता.व जि. नांदेड– ४३१६०५ | **व्हीआयपी रोड नांदेड शाखा** सौ.योगीता नतेश परदेशी (कर्जदार) श्री.राजेशसिंह अशोकसिंह चव्हाण (जामीनदार) | सर्व्हे नं.१७/ए/३, प्लॉट नं.२,३,४ वरील फ्लॅट नं.३०१, तिसरा मजला, ओम साई अपार्टमेंट,वाडी बु, बी के, ता.जि.नांदेड–४३१६०५ येथील सौ.योगीता नतेश परदेशी यांच्या मालकीची जागा व इतर साहित्य एकुण कार्पेट क्षेत्रफळ ५९.३६ स्क्वे.मी | रु.१९.०० लाख इएमडी रु.१,९०,०००/– | रु.२०.२८ लाख + व्याज व इतर खर्च दि.२९.०९.२०२५ पासुन | तारीख : दि.०२/०७/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री.मद्दीराला रंजीथ कुमार (मुख्य प्रबंधक) फोन : 02382-245252; मो : 8639549526 Latur.Solapur@bankofindia.bank.in |

**१५ दिवस विक्री सुचना रुल ८(६) आर/डब्ल्यु ९(१) सरफेसी ॲक्ट, २००२ कलम अन्वये**

सर्व नियम व अटी विषयी जाणुन घेण्यासाठी कृपया पुढील सांकेतीक स्थळांवर भेट द्या https://baanknet.com/eauction-psb/home Secured website i.e.https://bankofindia.bank.in//and/or https://BAANKNET.com इंग्रजी व मराठी जाहिरातींच्या मसुद्यात विसंगती आढळल्यास इंग्रजी जाहिरातीचा मसुदा अंतिम ग्राह्य धरला जाईल

**दि.२३.०६.२०२६**
**स्थळ : सोलापूर**

**प्राधिकृत अधिकारी बँक ऑफ इंडिया**

Jhaveri


# बिलोली पोलिस ठाण्यात ५० टक्क्यांहून अधिक पदे रिक्त

**बिलोली, ता. २२ (बातमीदार) :** मराठवाडा-तेलंगणा सीमेलगत असलेल्या बिलोली पोलिस ठाण्यात ५० टक्क्यांहून अधिक पदे रिक्त असल्याने दैनंदिन कामकाजावर ताण वाढला आहे. बदली झालेले अनेक कर्मचारी अद्याप रुजू न झाल्याने कार्यरत पोलिसांवर अतिरिक्त कामाचा बोजा पडत आहे.

बिलोली पोलिस ठाण्याच्या हद्दीत ३१ गावे येतात. येथे पोलिस निरीक्षक, सहायक पोलिस निरीक्षक व उपनिरीक्षकांची पदे भरलेली असली तरी हेड कॉन्स्टेबलची १२ आणि पोलिस कॉन्स्टेबलची १४ पदे रिक्त आहेत. याशिवाय काही कर्मचारी उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय, न्यायालयीन कामकाज व न्यायाधीशांच्या सुरक्षेसाठी नियुक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळ आणखी कमी झाले आहे. निजामकालीन इमारतीत सुरू असलेल्या या ठाण्यात कर्मचाऱ्यांसाठी शौचालयाची सुविधाही नाही. पिण्याच्या पाण्याची समस्या लोकमंवार परिवाराने वॉटर फिल्टर उपलब्ध करून दिल्यानंतर दूर झाली. जूनमध्ये सहायक पोलिस निरीक्षक कमल शिंदे यांच्यासह काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या. नव्याने बदली झालेल्या १६ पैकी केवळ एक अधिकारी व पाच कर्मचारी रुजू झाले आहेत. तसेच दोन पोलिस वाहने असूनही चालक नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत.

> अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे कामाचा ताण वाढला असून, बदली झालेल्या कर्मचाऱ्यांनी लवकर रुजू व्हावे.
> **-बाळासाहेब रोकडे,** पोलिस निरीक्षक.

## सव्वातीन लाखांचा ऐवज नेला चोरून

**नांदेड, ता. २२ :** शहरातील विष्णुनगर परिसरातील एका बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा तीन लाख १७ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना सोमवार (ता. १५) ते शनिवार (ता. २०) दरम्यान घडली. चंद्रकांत दिगांबर दमकोंडावार (वय ६२, रा. विष्णुनगर) यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातून सोन्या-चांदीचे दागिने व नगदी रक्कम चोरून नेली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

# पावसाळा आला तरी पुलांचे काम अर्धवटच

**कंधार, ता. २२ (बातमीदार) :** कंधार-नरसी मार्गावरील कमी उंचीच्या पुलांचे काम पावसाळ्यापूर्वी हाती घ्यावे, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांनी वारंवार केली होती. बाजार समितीचे सभापती व उपसभापती यांनीही हा प्रश्न आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या निदर्शनास आणून दिला होता. मात्र, पावसाळा सुरू होऊनही पुलांचे काम न झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

कंधार-नरसी हा महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. मानसपुरी, बाचोटी आदी ठिकाणच्या कमी उंचीच्या पुलांवरून पावसाळ्यात पुराचे पाणी वाहत असल्याने परिसरातील २० ते ३० गावांचा संपर्क तुटतो. बाचोटी, बामणी फाटा, चिंचोली, बारुळ आदी गावांतील नागरिकांना याचा मोठा फटका बसतो. शालेय विद्यार्थ्यांनाही जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. दरवर्षी या पुलांवरून पाणी वाहत असल्याने अनेक वाहने वाहून जाण्याच्या तसेच अपघातांच्या घटना घडल्या आहेत. अनेक वर्षांपासून मागणी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

### आणखी किती दिवस त्रास सहन करायचा?

**■ गेल्या अनेक वर्षांपासून पुलांच्या कामाची मागणी होत असतानाही ना सार्वजनिक बांधकाम विभाग, ना लोकप्रतिनिधी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत आहेत. पावसाळा आला की भीतीचे वातावरण निर्माण होते. दरवर्षी आश्वासने मिळतात; मात्र प्रत्यक्ष काम होत नाही. त्यामुळे आणखी किती दिवस हा त्रास सहन करायचा, असा सवाल परिसरातील ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.**


